प्रेसनोट दि. 03/09/2026

अ.क्र	शिर्षक	तपशिल
1	घटक	**पुणे घटक**
2	तक्रारदार	पुरुष, वय 59 वर्षे
3	आरोपी	उमेश सुब्रव कुटे, वय 37 वर्षे, पद- लिपिक, (वर्ग 3), नेमणूक सांगवी करसंकलन विभागीय कार्यालय, सांगवी, पिपंरी चिंचवड महानगर पालिका, पिपंरी, रा.ठिकाण- शुभ कलश सोसायटी,फ्लॅट नंबर 1109, बि विंग, गट नंबर 920 नेवाळे वस्ती, चिखली, पुणे.
4	तक्रार	**तक्रार**- दिनांक 02/09/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी पिंपळे गुरव येथे एक गुंठा जागा खरेदी करून त्यावर तीन मजली इमारत बांधकाम केलेले आहे, त्या इमारतीचे नवीन मालमत्ता कराची आकारणी करण्याकरीता तक्रारदार यांनी दिनांक 20/08/2026 रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग, सांगवी विभागीय कार्यालय येथे अर्ज दिला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक उमेश सुब्रव कुटे, लिपिक यांनी तक्रारदार यांना त्यांच्या इमारतीचा प्रतिवर्ष रूपये 91,472/- कर होईल तो कमी करून प्रतिवर्ष 50,000/- च्या आत करू शकतो असे म्हणून तक्रारदारांकडे रूपये 1,50,000/- लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये 1,30,000/- मागणी केली आहे. अशी तक्रार, तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात दिली आहे.
5	तक्रारीची पडताळणी	तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 03/09/2026 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक उमेश सुबराव कुटे, लिपिक, कर संकलन विभागीय कार्यालय, सांगवी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या इमारतीचा मालमत्ता कर कमी आकारणी करण्याकरिता रूपये 1,30,000/- व तडजोडी अंती रूपये 1,20,000/- लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दाखविल्याचे निष्पन्न झाले आहे.
6	सापळा कार्यवाही	वरील प्रमाणे लाच मागणी निष्पन्न झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट कडून दिनांक 03/09/2026 रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता आरोपी लोकसेवक उमेश सुबराव कुटे, लिपिक, कर संकलन विभागीय कार्यालय, सांगवी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी तक्रारदार यांच्याकडून त्यांच्या वरील कामाकरिता रूपये 1,20,000/- लाचेची रक्कम आनंद नगर, सांगवी, पुणे येथील स्विमिंग टॅंक रोडवर पंचासमक्ष 14.00 वा. स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.
7	गुन्हा रजिस्टर नं./ कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा,दिनांक व वेळ	सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
8	आरोपी अटक दिनांक,वेळ	आरोपी लोकसेवक यास आंज दिनांक 03/09/2026 रोजी 14.00 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे.
9	सापळा अधिकारी	श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 7722011255
10	पर्यवेक्षण अधिकारी	श्री. सतिश वाळके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020
11	सापळा पथक	1) कैलास महामूलकर, पोकॉ/ 9843, 2) अश्विन कुमकर पोकॉ/9175 3) सहा.फौजदार अविनाश चव्हाण, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.
12	मार्गदर्शन	1)श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.पुणे, मो.नं. -9823167154 2)श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे,मो.नं. 9029030530

13 लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

	घटक कार्यालय	**परिक्षेत्र कार्यालय**	**ला.प्र.वि, मुख्यालय**
	1	2	3
पत्ता	पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001	पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 01	ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030
दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक	(020)26132802, व्हॉटस्ॲप क्र.9403781064, 1064	(020) 26122134, 1064	(022) 24921212
ई- मेल आय.डी.	dyspacbpune@mahapolice.gov.in	spacbpune@mahapolice.gov.in	acbwebmail@mahapolice.gov.in

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे